नियमित दिवाणी दावा क्र.६१/२०२१
आय.ए. नं. ३/२०२२

आदेश निशाणी क्र. ६२ वर

1. वादीने सदरचा अर्ज दाव्यात कैफियत/म्हणणे दाखल करण्यास मुदत मिळणेसाठी दाखल केला आहे.

2. वादी यांचे असे कथन आहे की, सदर कामी वादीस नि.क्र.५२ व ५९ वर म्हणणे दाखल करणेसाठी नेमण्यात आले आहे. सदर अर्जाचे अनुषंगाने काही कागदपत्रे व माहिती घेवून म्हणणे दाखल करण्यास पुढील मुदत मिळावी अशी विनंती केली आहे.

3. प्रतिवादींनी म्हणणे देवून अर्जास हरकत नोंदविली. वादीचा अर्ज खोटा, लबाडीचा असुन प्रतिवादीस मुळीच मान्य व कबुल नाही. कामकाज लांबविण्याचे हेतून सदरचा अर्ज केलेला आहे तरी अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

4. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. वादीने त्यांना योग्य ती माहिती व कागदपत्रक घेवून कैफियत/म्हणणे दाखल करायची आहे असे कथन केले आहे. वादी यांना कैफियत/म्हणणे देण्याची संधी न दिल्यास त्यांचे नुकसान होणार आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे, पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

आ दे श

1. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
2. वादीस कैफियत/म्हणणे दाखल करण्यास पुढील तारखेपर्यंत मुदत देण्यात येत आहे.

सही/-

दि. १०/०२/२०२२ ( अर्चना श्रीपत नलगे )

२ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment.

| | |
|---|---|
| a Name of the Stenographer | : Shirsikar V.G. |
| b Court | : $2^{nd}$ Jt. Civil Judge S.D.Pandharpur |
| c Date of Judgment | : 10/02/2022 |
| d Judgment signed by P.O. On | : 10/02/2022 |
| e Judgment uploaded on | : 10/02/2022 |